## रेग्युलर दिवाणी मुकदमा नं.१०६/२०१२ मधील निशाणी ४६ खालील आदेश

प्रस्तूतचा दावा हा वादी यांनी प्रतिवादी विरूध्द दावा मिळकतीतील प्रतिवादी क्र.१ यांचा असलेल्या १/४ हिश्श्यातील वादी यांचा असलेला ३/४ हिस्सा सरस निरस मानाने वाटप करून व निरंतर ताकीदीसाठी केलेला आहे. सदरचा अर्ज हा वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जातील वादीचे कथनानुसार प्रस्तूतचा दावा हा न्यायप्रविष्ठ असताना प्रतिवादी १ ते ५ यांनी दि.३०/०८/२०१३ रोजी दावा मिळकत गट नं.१११४ एकूण क्षेत्र ३हे.७२.४ आर आकार ५रू १३पै यापैकी ५आ ४पै हिस्सा संपूर्ण म्हणजेच १ हे. २४ आर शेतजमीन श्री. राजू धोंडीबा इंगवले व सौ.सुजाता राजू इंगवले यांना खरेदी खताने विक्री केलेले आहे. त्यामुळे सदर दाव्यामध्ये त्यांना प्रतिवादी क्र.३४ व ३५ म्हणून सामील करणे आवश्यक आहे. तसेच खरेदीखताबाबतचा परिच्छेद ५अ व ५ब दाव्यात सामील करणे गरजेचे आहे. वादीचे कथनानुसार सदरची दुरूस्ती ही सदरचा दावा न्यायप्रविष्ठ असताना झालेल्या बदलाबाबत असल्याने ती करणे न्यायाचे व गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी १ ते ५ व ३४, ३५ यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दावा दुरूस्ती न झाल्यामुळे वादींचे नुकसान होणार आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याचे मूलभूत स्वरूपात कोणताही बदल होणार नाही त्यामुळे वादींना मूळ दाव्यात दुरूस्ती करण्याची परवानगी मिळावी ही विनंती केली आहे.

३. वादींचे सदरहू अर्जास नि.५३ लगत प्रतिवादींनी आपले म्हणणे दाखल

केले असून प्रतिवादींचे कथनानुसार वादींचा अर्ज लबाडीचा आहे व मागितलेली दुरूस्ती नियमबाहय आहे. वादींनी मागितलेली दुरूस्ती कलम ५अ व ५ब या चुकीच्या आहेत. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करणेत येवून वादीस रू.२५हजार कॉस्ट करावी अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. वादींनी नि.४९ लगत प्रतिवादी क्र.१ ते ५ व राजू धोंडीबा इंगवले व सौ.सुजाता राजू इंगवले यांचेत झालेल्या खरेदीदस्ताची नक्कल दाखल केली आहे. सदर प्रतिचे अवलोकन केले असता, असे दिसते की दि.३०/०८/२०१४ रोजी प्रतिवादी १ ते ५ यांनी राजू धोंडीबा इंगवले व सौ.सुजाता राजू इंगवले यांना सदरचा हिस्सा विकलेला आहे. त्यामुळे ते दोघेही प्रस्तूत दाव्यात आवश्यक पक्षकार बनलेले आहेत.त्यामुळे दाव्यात प्रतिवादी क्र.३४ व ३५ म्हणून त्यांना सामील करणे न्यायोचित होईल. वादींनी कलम ५अ व ५ब मध्ये झालेल्या व्यवहाराबाबची मजकूर सामील करण्याची परवानगी मागितली आहे. सदर मजकूराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर मजकूर सामील केल्यानंतर दाव्यात कोणताही बदल होणार नाही. या उलट दावा गुणावगुणांवर ठरविणेस मदत होणार आहे. त्यामुळे वादीस कलम ५अ व ५ब दाव्यात सामील करण्याची परवानगी देण्यात येते व मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. वादीचा नि.४६ लगतचा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादींनी १४ दिवसाचे आत सदरची दावा दुरूस्ती करून दावा दुरूस्तीची प्रत न्यायालयात दाखल करावी.

३. उभय पक्षांनी आपापला खर्च सोसावा.

स्थळ : खंडाळा ( पी. एन. ढाणे )
दिनांक : २२/०९/२०१४ सह दिवाणी न्यायाधीश, खंडाळा